ISBN: 978-93-88732-09-3

# अणणाभाऊ साठे
# समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे तत्वज्ञान



## संपादक

विठ्ठल गुंडे
नवनाथ पवळे
दयाराम मस्के

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts, Commerce & Science College,
Washim Dist. Washim

150

# अण्णाभाऊ साठे

## समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे तत्वज्ञान

## संपादक

विठ्ठल गुंडे

नवनाथ पवळे

दयाराम मस्के

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

ISBN: 978-93-88732-09-3

## DECLERATION BY THE PUBLISHER

### संपादक

विठ्ठल गुंडे
नवनाथ पवळे
दयाराम मस्के

**Publication**

**Shaurya Publication, Latur**

**Khadgaon Road, Kapil Nagar, Latur-413512**

Email-hitechresearch11@gmail.com

**Printing**

Shaurya Offset, MIDC, Latur

**First Edition** – 14th Dec. 2019

**Note: -** Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (S) is are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from Prof. Navnath Pawale and Prof. Vithal Gunde.

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College
Washim Dist. Washim

# अनुक्रमणिका

1. अण्णाभाऊ साठेः जीवन, साहित्य आणि कार्य 10
प्रा. डॉ. अहिरे भास्कर मुरलीधर
2. अण्णाभाऊ साठेः जीवन, साहित्य आणि कार्य 15
डॉ. राणी जगन्नाथराव जाधव
3. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक विचार 21
गोकर्णा दगडू शिंदे
4. अण्णाभाऊ साठेः जीवन, साहित्य आणि कार्य 26
प्रा. डॉ.रमेश वसंतराव गटकळ
5. समाजक्रांतीचे जननायक अण्णाभाऊ साठे 31
डॉ. भालेराव जे. के.
6. अण्णाभाऊ साठे यांचे जीवन साहित्य आणि कार्य 34
डॉ. जे. बी. कांगणे
7. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे 40
प्रा. डॉ. कुमार गव्हाणे
8. अण्णाभाऊ साठे एक अनुभवाचे विद्यापीठ 47
डॉ. लहूकुमार खंडाळे
9. जागतिक संदर्भात अण्णाभाऊ साठेंची प्रासंगिकता 50
मनीषा बाळासाहेब बल्लाळ
10. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनातील सामाजिक तेचे वास्तव चित्रणः
कादंबरी वांग्मय प्रकाराच्या अनुषंगाने 54
प्रा. डॉ. रेखा कचरूजी मेश्राम
11. अण्णाभाऊ साठेः मानवतावादी साहित्य 59
डॉ. एन. व्ही. शिंदे
12. दलित साहित्य आणि अण्णाभाऊंची दलित कथा आणि ग्रामीण कादंबरी 63
प्रा. डॉ. नंदकुमार शंकरराव इंगळे
13. अण्णाभाऊ साठेः मानवतावादी साहित्यिक 70
प्रा. निवृत्ती मारोतराव टारफे
14. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व कार्याचा आढावा 76
डॉ. पी. बी. सिरसट
15. स. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्य आणि साहित्यातील
राजकीय विचार एक चिकित्सक अभ्यास 80
प्रा. डॉ. पांडुरंग रामराव सुतार
16. अण्णाभाऊ साठेः मानवतावादी साहित्यिक 90
प्रा. डॉ. प्रधान रामकृष्ण ज्योतिबा

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

17. अण्णाभाऊ साठेः मानवतावादी साहित्यिक 95
प्रा. डॉ. प्रज्ञा काशिनाथ कांबळे, शिरगांवकर
18. अण्णाभाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय 102
प्रा. डॉ. प्रमिला मुखेडकर
19. अण्णाभाऊ साठे विचार व साहित्य 108
प्रा.डॉ. दिलीप नि. लांजेवार
20. अण्णाभाऊ भाऊ साठे जीवन साहित्य आणि कार्य 113
प्रा. पाटील वंदना सांडूराव

Assistant Professor

# अण्णाभाऊ साठे : विचार व साहित्य

प्रा.डॉ. दिलीप वि. लांजेवार

मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम

---

प्रस्तावना:-

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व प्रबोधनाच्या परिवर्तनवादी चळवळीचा फुले आंबेडकरानंतरचा सच्चा जात,वर्ग जाणिवेचा क्रांतिकारी साहित्यिक म्हणून ज्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे ते म्हणजे अण्णाभाऊ साठे, फुले आंबेडकरी व मार्क्सवादी विश्लेषण पध्दती आपल्या साहित्यातून मांडणारा क्रांतिकारी वास्तववादी कार्यकर्ता, लेखक,नाटककार, साहित्यिक म्हणजे अण्णाभाऊ होय. सच्चा मार्क्सवादी व सच्चा आंबेडकरवादी अशी ओळख अण्णा भांऊनी आपल्या साहित्यातून व विचारांतून संपूर्ण महाराष्ट्राला करून दिलेली होती. अण्णाभांऊचा वैचारिक प्रवास हा मार्क्सवादाचा कडून आंबेडकरवादाकडे झालेला आहे. म्हणून ते जात,वर्ग, जाणिवा समजून घेऊन त्या आपल्या साहित्यलेखनातून जगासमोर मांडणारे क्रांतिकारी साहित्यिक होते.

**अण्णाभाऊ साठे आणि मार्क्सवाद :-**

संघर्ष करणारी माणस लढणारी असतात. प्रतिकाराचे दुसरे नाव म्हणजे संघर्ष होय. आपले अधिकार, मानवी हक्क व आपणावर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करावयाचा असेल तर संघर्ष करावाच लागतो. या वर्गीत वास्तवाला अनुसरून अण्णा भांऊचे संपूर्ण आयुष्यात संघर्ष व ते मांडण्यात गेले.

अण्णा भांऊच्या आयुष्याची सुरूवात संघर्षाने झालेली आहे. वाटेगाव ते मॉस्को व महात्मा फुले, मार्क्स पासून आंबेडकरापर्यंतचा प्रवास हा त्यांच्या संघर्षाचा पुरावाच होय. अण्णा भाऊंचा जन्म ज्या सातारा,सांगली, वाटेगाव परिसरात झाला त्या भागात अनेक क्रांतिकारकांनी जन्म घेतलेला होता. त्यात क्रांतिवीर नाना पाटिल, उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके, फकिरा अशा कितीतरी क्रांतिकारकांनी परसत्तेविरूध्द संघर्ष केलेला होता. राजकीय बंड निर्माण करून ते स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढले होते. म्हणून ते लपून हिंडू लागले. त्यामुळे ते मुंबईला गेले आणि त्यांच्या आयुष्याचा दुसरा टप्पा सुरू झाला.

एखाद्या व्यक्तिकडून एखाद्या विचारप्रणालीचा स्वीकार हा बहुधा त्या व्यक्तीची सामाजिक, आर्थिक व कौटूंबिक पार्श्वभूमी व त्या पार्श्वभूमीचे त्या व्यक्तीवरील परिणाम यांच्यावर अवलंबून असतो. अभावग्रस्त, अन्यायग्रस्त माणसे ही विषमताविरोधी विचारसरणीच्या आकर्षणा कडे वळू शकतात, म्हणून अण्णा भांऊना

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

भाकरीचा प्रश्न महत्वाचा वाटला. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने येणारे काम आणि त्या कामाचे महत्व सांगणारे मार्क्सवादी तत्त्वज्ञान याचा त्यांना परिचय झाला आणि त्यातूनच ते मार्क्सवादाकडे वळले. मार्क्सवाद त्यांना त्यांच्या भौतिक मुक्तीचा एकमेव मार्ग वाटला. म्हणून ते निष्ठेने मार्क्सवादी तत्वज्ञान समजावून घेऊ लागले.

मार्क्सवादी आकर्षणामुळे त्यांना जात जाणिवेबरोबरच वर्ग जाणीव ही होऊ लागली. जात आणि वर्ग जाणिवा हेच अण्णा भाऊंच्या साहित्याचे प्रयोजन बनले. शेवटी या दोन्ही जाणिवा मानवी प्रतिष्ठा व मानवमुक्तीचा संदेश देतात. मार्क्सवादाची ओळख सर्वप्रथम अण्णा भाऊंना रेठरे यात्रेत क्रांतीसिंह नाना पाटलांच्या भाषणाने झालेली होती. तेव्हापासून ते मुंबईतील मोरबाग व कोहिनूर मिलमध्ये कामगार म्हणून काम करत असताना मार्क्सवादाची जास्त जवळीक आली.

मार्क्सवादाची ओळख होण्यापूर्वी अण्णा भाऊंना जातीयतेचे चटके त्यांच्या जन्मापासून व ते ज्या जातीत जन्माला आले त्या मांग जातीमूळे त्यांनी सोसलेले व भोगलेले होते. हिंदू धर्म व जातीव्यवस्थेच्या स्तरीकरणाचा परिणाम म्हणून त्यांना अस्पृष्यता, जातीयता, दारिद्रय, अपमान, अवहेलना भोगाव्या लागल्या. कम्युनिस्ट चळवळीत काम करत असतानाही त्यांना वर्गजाणीव झाली होतीच. पण जातीयता ही कामगारातही असते. कामगार हा केवळ एक वर्ग नसून कामगारांचीही एक जात असते. याचा त्यांना अनूभव मोरबागच्या गिरणीत काम करत असताना आला. जेव्हा त्यांची नेमणूक त्रासनखाण्यात झाली. तेव्हा त्या ठिकाणी त्यांना तुटलेले धागे पुन्हा जोडावे लागत होते व धागे तोंडातली थुकी लावून जोडावे लागत होते. परंतू तेथील कामगारांना अण्णा भांऊची जात माहीत झाली आणि मांगाच्या थुंकीने बाटलेल्या धाग्याला आम्ही हात लावणार नाही. अशी त्यांनी भूमिका घेतली आणि अण्णा भांऊनी तेथील काम सोडले.

**अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यः-**

महात्मा फुले, मुक्ता साळवे यांच्यापासून आलेली जात, वर्ग जाणीव अण्णा भांऊना कळलेली होती. हीच जाणीव त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडून सामाजिक आंदोलनाची रूपरेषा निर्माण केली. समाज परिवर्तनासाठी त्यांनी साहित्य हे माध्यम निवडल. जे माध्यम प्रस्थापित तत्कालीन साहित्यीक प्रयोजनापेक्षा निश्चितच वेगळे होते. ज्या महात्मा फुल्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून जात,वर्ग जाणिवा मांडल्या व त्या प्रकाशात आणल्या त्याच साहित्यीक साधनांचा वा माध्यमांचा वापर अण्णा भांऊनी केला. अण्णा भांऊच्या साहित्याबदल प्र. के. अत्रे यांनी फार मार्मिक सार सांगितलेले आहे. ते म्हणतात. अण्णाभांऊचे साहित्य म्हणजे जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांचे साहित्य. अण्णा भाऊंचा मुळातच साहित्यिक पिंड होता. पण तत्कालीन साहित्य निकषानूसार अण्णा भांऊचे साहित्य हे साहित्य मानले जात नव्हते. तरी पण भागलेल व सोसलेल आयुष्य त्यांनी सर्वसामान्य लोकांना समजेल, कळेल या भाषेतून लिहिले. म्हणून ते रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांचे वाक्य उध्दृत करतात, ''जो साहित्यीक जनतेची कदर करत नाही, जनता त्या साहित्यिकाची कदर जनता करत नाही''.

अण्णा भाऊंनी विविध साहित्यप्रकार हाताळलेले आहेत. 35 कादंबऱ्या 8 पटकथा, 15 स्फुट कथा, एक प्रवासवर्णन, 3 नाटके, 12 उपहासात्मक लेख, 14 लोकनाट्ये, 10 पोवाडे ही एवढी माठी साहित्यसंपदा अण्णा भाऊंनी लिहिली. त्या काळात ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, ग.त्र. मांडलेकर या मराठी साहित्यिकांचे मोठे नाव होत. त्या वेळी एक वाद चाला होता कलेसाठी कला की जीवनासाठी कला अण्णा भाऊंनी जीवनासाठी कला या अनुषंगाने आपली साहित्यसंपदा निर्माण केली. तसेच समाजातील वंचित,दीन दलीत, कष्टकरी स्त्रिया, भटके यांच्या व्यथा, वेदना आणि वंचितता आपल्या साहित्यातून मांडल्या. त्यांच्या प्रत्येक कादंबरीचा, कथेचा, नाटकाचा, लोकनाट्याचा विषय हा समाजातल्या तळाचा बंडखोर व्यक्ती होता. तो सन्मानासाठी जगण्यासाठी धडपडत होता. म्हणून तो प्रमुख पात्र प्रमुख भूमिका साभांळत होता. अण्णा भाऊंनी वगनाट्याला क्रांतीनाट्याचा साज दिला. या लोकनाट्याद्वारे त्यांनी कामगारांच्या श्रमाचा पुरस्कार करणारे आणि जमीनदाराच्या शोषणाचा धिक्कार करणारे तत्त्वज्ञान मांडले.

अण्णा भाऊंनी 'लालबावटा' कलापथक 1942 मध्ये इप्टा यांच्या माध्यमातून वर्गशोषण म्हणजेच जमीनदार, सावकार यांच्या शोषणाचे जाहिर प्रगटन केले. हे सर्व कार्य करत असताना त्यांना शाहिर अमरशेख, द.ना.गव्हाणकर, कॉ. मोरे, उषा मोरे, राघो कदम, तसेच इप्टाचे बलराज साहनी, कैफ आजमी, ए. के हंगल, सुधीन्द्र मुखर्जी अशा अनेक कलावंतांच्या साहाय्याने कम्युनिस्ट पक्षातर्फे वर्ग शोषणाची जाणीव निर्माण करून दिली. इतर कुठल्याही अस्सल मार्क्सवादी लेखकाप्रमाणे अण्णा भाऊंची कलाही समानता प्रस्थापित करणे आणि पिळवणूक, अन्याय यांचा अंत करणे हे उद्दिष्ट साधणारे सामाजिक बदलाचे एक साधन आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यातील सर्व व्यक्तिरेखा अन्यायाविरूध्द लढतात. तसेच त्यांच्या कथात दलितेतर व्यक्तीसुध्दा सामाजिक न्यायाच्या भूमिका घेताना दिसतात. अण्णा भाऊंच्या साहित्याबद्दल डॉ. एस.एस. भोसले असे म्हणतात की, फुले आंबेडकरांचा वारसा घेऊन उभे राहिलेले, मराठी साहित्य संस्कृतीची परंपरा नाकारणारे अण्णा भाऊ हे पहिले दलित बंडखोर लेखक आहेत.

'युगांतर' या साप्ताहिकात 1969 ला नारायण सुर्वे अण्णा भाऊंबद्दल लिहितात, विषय आणि अनुभव यासंदर्भात मराठी कथेची क्षितिजे पददलितांचे जणू ते साहित्यातील प्रवक्ते बनले. उपेक्षितांचे, पददलितांचे व विकल्या जाणाऱ्या माणसांच्या जीवनाला त्यांच्याइतके जवळून कुठल्याही लेखकाने स्पर्श केलेला नाही.

अण्णा भाऊंच्या लेखन प्रेरणेला मार्क्सवादी पक्षाचा फार मोठा हातभार होता. अण्णा भाऊंवर अलेक्सी मॅक्झिम गोर्की यांच्या समाजवादी वास्तववादाचा फार प्रभाव होता. कोणत्याही कलावंताच्या कलेची समीक्षा करत असताना आपण त्यांचे सामाजिक संदर्भ टाळू शकत नाही व टाळायचे नसतात. अण्णा भाऊ जात वर्गीय हितसंबधांच्या पूर्णतया विरोधी आहेत. प्रखर बुध्दिवाद, समता, स्वातंत्र विषमता वाद समाजवादी विचार यांच्या वैचारिक साधनेवर भाऊंचा वाङ्मयीन दृष्टिकोन उभा आहे. अण्णा भाऊ हे सामाजिक बांधिलकी मानणारे साहित्यिक होत. त्यांच्या मते, साहित्य हे समाजपरिवर्तनाचे प्रचंड शास्त्र आहे अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. अण्णा भाऊंच्या मूळ लेखनाच्या प्रेरणा या कम्युनिस्ट चळवळीत नसून त्या अंगभूत होत्या. त्याच्या साहित्यात



Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

उपेक्षितांच्या अंतरंगातील लढाऊपणा, बंडखोरपणा, क्रांतिकारक , हटवादी वृत्ती, इत्यादी जीवनस्पर्शी चित्रण दिसून येते. 'फकिरा' ही कांदबरी उपेक्षित दीनदलितांच्या स्वातंत्र्यलढा चा वाङःमयाचा ठेवा होय.

**अण्णाभांऊचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनः-**

अण्णा भांऊनी आपल्या वैयक्तिक आयुष्याची पर्वा न करता लिहित राहीले. ते आपल्या पत्नी कोंडाबाईना म्हणत असत, अग जगात फक्त आपलच दुख नाई कितीतरी गरीब माणस तडफडून मरत्यात लई माणसं तुप रोटी खात्यात. त्यांचेकडे मुबलक पैका असतो. आन आपल्या सारखी माणस आयुष्यभर टाका रगडत जगत्यात मी का वंगाळ काम करत न्हाई मार्क्स, लेनिन ह्या महात्म्यांनी सांगून ठेवलेल हाय. यावरून अण्णा भांऊबदलची ओढ लक्षात येते. त्यांनी आपल्या वैयक्तिक सुखाकडे दुर्लक्ष केले होते. त्यांनी त्यांच्या साहित्य कार्यातून कामगारांच्या समस्या, भांडवलदारांचे शोषण, सावकार, जमीनदार यांचा जूलूम, गरीबाची चाललेली पिळवणूक, छळवणूक विषय मांडलेले होते. कुटूंबाचा विचार आणि जगातल्या गरिबांचा विचार यांचे द्वंद्व यामूळे त्यांच्या मनात वादळ उठायच. यामूळे अण्णा भांऊची वैफल्यग्रस्तता वाढत जात होती. फक्त त्यांच्यासोबत होता मॅक्झिम गॉर्कीचा फोटो, मार्क्सचे तत्त्वज्ञान, गरिबांबाबतची कणव, शोषित पिडित जनतेचा कळवळा, श्रमिक कामगारांचे लढे आणि परिवर्तनाचा विचार याशिवाय अण्णा भांऊजवळ दुसर काही नव्हत. अण्णा भांऊनी फुले,शाहू, आंबेडकर व मार्क्स चा वारसा साहित्याच्या माध्यमातून पुढे नेला.

अण्णा भांऊनी लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र शाहिरीच्या माध्यमातून पिंजून काढला. तसेच त्यांनी कम्युनिस्ट विचारधारा असलेली मासिके, लोकसाहित्य आणि युगांतर या साप्ताहिकासाठी वार्ताहर म्हणून काम करत असताना मार्क्सचा क्रांतीविचार सर्वसामान्य लोकांत पसरवला. लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी लोकनाट्य, लावण्या, पोवाडे असे वाङ्मय प्रकार हाताळले. 'अकलेची गोष्ट', 'शेटजींच इलेक्शन' इत्यादीद्वारे कार्ल मार्क्सच्या इतिहासाच्या उत्क्रांतीची संकल्पना समजावून सांगणे व सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमधील कामगाराचे स्थान त्यांच्या मनावर ठसवणे हा या लोकनाट्याचा मुख्य उद्देश होता तसेच कम्युनिस्ट पक्षाची धोरण व कार्यक्रम यांचे सकारात्मक व अनुकूल असे विचार लोंकापुढे प्रस्तुत करणे हे होते.

अण्णा भांऊनी आपल्या साहित्यातून रडण्यासाठी जगू नका तर जगण्यासाठी लढा असा संदेश दिला. आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र अण्णा भाऊ मार्क्सवादाकडून आंबेडकरवादाकडे वळले याचा अर्थ त्यांनी मार्क्सवाद सोडला असा नसून या दोन्ही विचारसरणीची खरी गरज या देशातील जात,वर्ग समस्या सोडवण्यासाठी आहे, या निष्कर्षाप्रत ते येतात. म्हणून तर त्यांनी आपली 'फकिरा',कादंबरी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केलेली आहे. अण्णा भांऊच्या साहित्यात फुल्यांची व्यापक दृष्टी, शाहू महाराजांची सामाजिक जाणीव आणि आंबेडकरांचा स्वाभिमान दिसून येतो.

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

## समारोप:-

अण्णा भाऊ हे जात आणि वर्ग या दोघांचे ही बळी असल्यामूळे त्यांनी आपल्या वाङ्मयात जात आणि वर्ग लढा या दोन्हीचा ही समाचार घेतलेला आहे. अण्णा भाऊ हे एक व्यक्ती म्हणून मोठे नाहीत पण ते एक क्रांतिकारक, परिवर्तनवादी विचारवंत म्हणून मोठे आहेत. विशेषतः 1956 नंतरचे अण्णा भाऊंचे साहित्य हे परिवर्तनवादी व प्रबोधनवादी आहे. अण्णा भाऊ 1946 पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आंदोलनाने प्रभावित झाले होते. त्यांनी त्यांच्या एका वंगातही लिहिले होते. अण्णा भाऊ मार्क्सवादाची चिकित्सा भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात करणे सुरू केलेले होत. मार्क्सवाद, जगाचा अभ्यास करतांना कामगारांच्या शोषणाचा, त्यांच्या पिळवणुकीचा विचार मांडतो. पंरतु भारतीय दलितवर्ग हा दारिद्रय आणि आर्थिक शोषणाचा बळी आहे. तसा तो तेथील मनुवादी जाती समाज रचनेने निर्माण केलेल्या सामाजिक शोषणाचा बळी आहे. याचे भान अण्णा भांऊना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लढ्यांनी, सामाजिक समतेसाठी सुरू असलेल्या वर्णअंताच्या विचारांनी प्रभावित केले होते.

## संदर्भ:-


1) अण्णाभाऊ साठे, समाजविचार आणि साहित्य विवेचन: गुरव बाबुराव, मुंबई-1999

2) लोकशाहीर आण्णाभाऊ साठेः निवडक वाङ्‌मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.

3) जनवादी साहित्यिक अण्णाभाऊसाठे: डॉ. जनार्दन वाघमारे, डायमंड पब्लीकेशन,पुणे

4) अण्णाभाऊ साठे: चरित्र आणि कार्य - विजयकुमार जोखे, नालंदा प्रकाशन

5) अण्णाभाऊ साठे: बंजरंग कोरडे, विलास गिते, साहित्य अकादमी प्रकाशन

6) My Journey to Russia, Translated by Dr. Ashwin Ranjanikar New Voice Publication Aurangabad- 2014.



Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce & Science College,
Washim Dist. Washim